पुणे विद्यापीठ

जा.क्र.सीए/१०८०

गणेशखिंड, पुणे-७
दिनांक: २ ऑगस्ट, १९९०.

प्रति,

मा. संचालक,
चोपडा एज्युकेशन सोसायटी,
चोपडा, जि. जळगांव

विषय: जून १९९० पासून चोपडा येथे नवीन अध्यापक महाविद्यालय सुरु करण्याबाबत...

संदर्भ : शासन पत्र क्र. एसटीसी १९९०/(२८२७)/विशि-२ शिक्षण व सेवा योजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि. १२ जुलै १९९०.

महोदय,

वरील विषयाच्या संदर्भात मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस चोपडा येथे जून १९९० पासून नव्याने अध्यापक महाविद्यालय(८० विद्यार्थी प्रवेश क्षमता) महाराष्ट्र शासनाची सदरहू महाविद्यालय सुरु करण्यासाठी पुणे विद्यापीठ कायदा १९७४ कलम ४२ मधील संबंधित तरतुदीनुसार अंतीम मान्यता घेण्याच्या अटींवर परवानगी देण्यात येत आहे. पुढे आपणास असेही कळविण्यात येत आहे की, सोबत जोडलेल्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालातील अटींची पूर्तता करणे तसेच वर उल्लेख केलेल्या शासन निर्णयामधील अटींची पूर्तता करणे आपल्यावर बंधनकारक आहे याची कृपया नोंद घ्यावी. सदरहू अटींची पूर्तता केल्याचा अहवाल अध्यक्ष, स्थानिक चौकशी समिती यांच्याकडे पडताळणीसाठी पाठवावा व त्याची प्रत विद्यापीठ कचेरीकडे पाठवावी. आपण अटींची पूर्तता केली आहे याबाबतचा स्थानिक चौकशी समितीच्या अध्यक्षांचा पडताळणी अहवाल विद्यापीठास प्राप्त होणे आवश्यक आहे याची आपण कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

सोबत: स्थानिक चौकशी समितीच्या अहवालाची प्रत.

आपला विश्वासु,
(signature)
कुलसचिवांकरिता.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना:

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, शिक्षण व सेवा योजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
२. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, पुणे-१
३. मा. प्राचार्य, अध्यापक महाविद्यालय, चोपडा
४. मा. उपकुलसचिव (शैक्षणिक) ५. मा. उपकुलसचिव (परीक्षा)
६. मा. कक्षाधिकारी, मान्यता विभाग ८. मा. कक्षाअधिकारी, अभ्यासमंडळे
९. मा. कक्षाधिकारी, निवडणूक विभाग., पुणे विद्यापीठ, पुणे-७

१९९/१९९०/मो

True Copy Attested by

Principal
College of Education
Chopda Dist- Jalgaon